**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.** **दि. १४/०९/२०१९**

## येरवडा पोलिस स्टेशन पुणे शहर

## कौटुंबिक वादातून नदीत उडी मारून जीव देण्याचा प्रयत्न करणाऱ्या तरुणास येरवडा पोलीसचे कर्मचारी यांनी वाचविले

दिनांक १३/०९/२०१९ रोजीसायं.१६:३० वा.चे सुमारास एका इसमाने पर्णकुटी पो.चौकीस येऊन चौकीचे अंमलदार पो.हवा. ४१२८ सुनिल जाधव यांना कळविले की, एक इसम लहान बाळास घेऊन बंडगार्डन बंधारा येथे उडी मारण्यास जात आहे असे कळवितास पो.हवा. ४१२८ जाधव यांनी पर्णकुटी बीट मार्शलचे कर्मचारी पो.शि. ३८८६ सचिन जाधव व पो.शि. ८७७५ उमेश चिकणे यांना बोलावून घेवून त्यांचेसह नदीकिनारी जावून नदी किनारी राहणारे रहिवाशांना सोबत घेवून जीव देण्यास गेलेल्या तरूणाचे दिशेने गेले असता, त्या तरूणाने त्याचे हातातील लहान बाळास नदी पात्रातील बंडगार्डन बंधारा येथे सिमेंटचे कठड्यावर खाली ठेवून स्वतः नदीमध्ये उडी मारली. त्यावेळी पो.हवा. ४१२८ जाधव यांनी नदी किनारी राहणारे तरूणांचे मदतीने नदीत उडी मारलेल्या तरूणास बाहेर काढून त्याचे कडे विचारपूस केली असता त्याने त्याची पत्नी हिचेबरोबर भांडण झाल्याने रागाच्या भरात मुलीस घेवून नदीत उडी मारणार होतो परंतू नंतर विचार बदलून मुलीस कठड्यावर ठेवून पत्नीस बोलावून घेतले व मी जीव देण्यासाठी नदीत उडी मारली होती असे सांगितले. थोड्या वेळात त्याची पत्नी व आई सदर ठिकाणी आल्या. पो.हवा. ४१२८ सुनिल जाधव, पो.शि. ३८८६ सचिन जाधव व पो.शि. ८७७५ उमेश चिकणे यांनी सदर तरूणाचे व त्याचे कुटुंबियांचे समुपदेशन करून त्याचे मनपरिवर्तन केले. त्या तरूणाचे प्राण वाचविल्या बद्दल त्याचे कुटुंबियांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील पो.हवा. ४१२८ सुनिल जाधव, पो.शि. ३८८६ सचिन जाधव व पो.शि. ८७७५ उमेश चिकणे यांनी मिळालेल्या माहितीवरून तत्परतेने कार्यवाही करून नदीत उडी मारून जीव देण्याचा प्रयत्न करणारे तरूणाचे प्राण वाचवून त्याचे मनपरिवर्तन करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे.